# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## (नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

---

## हिततुल्य घटकांच्या सहकार्याने विद्यापीठाचा प्रवास सुकर - कुलगुरु
## विद्यापीठात हिततुल्य घटक व माजी विद्यार्थी सभा संपन्न

अमरावती :-

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यापीठाला खूप मोठा प्रवास करायचा आहे. विद्यार्थी विद्यापीठाचा प्रिय घटक असतो. विद्यापीठाशी संबंधित हिततुल्य घटक आणि माजी विद्यार्थी यांच्या अनुभवाचा लाभ विद्यापीठाला प्राप्त झाल्यास विद्यापीठाचा उच्च शिक्षणातील उच्चांक स्तरावरचा प्रवास सुकर होईल, असे प्रतिपादन कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी केले. विद्यापीठाच्यावतीने सर्व स्टेकहोल्डर्स, ॲकेडेमिशियन्स, एन्टरप्रिनर्स, रिसर्चर्स, ॲल्युमिनी व माजी विद्यार्थी यांची विद्यापीठाच्या डॉ.के.जी. देशमुख सभागृहात सभा आयोजित करण्यात आली होती, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी सभागृहात प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. अजय देशमुख, एम.बी.ए. विभागप्रमुख डॉ. संतोष सदार, व्य.प. सदस्य प्रा. दिनेश सुर्यवंशी, माजी कुलगुरु डॉ. विलास सपकाळ, उद्योजक श्री किरण पातुरकर, श्री संजय जाधव, प. व मू. मंडळाचे संचालक डॉ.जे.डी. वडते, अधिष्ठाता डॉ.एफ.सी. रघुवंशी, डॉ.सौ. स्मिता देशमुख, डॉ.सौ. मनिषा काळे, डॉ.डी.डब्ल्यु. निचीत, डॉ. अविनाश सावजी, डॉ. विजय ठाकरे उपस्थित होते.

मार्गदर्शन करतांना कुलगुरु म्हणाले, विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणातील बदलणाऱ्या परिस्थितीनुरुप जागरुक असण्याची गरज असून बदल स्वीकारण्याची आवश्यकता आहे. या विद्यापीठाचे चाळीस टक्के विद्यार्थी फर्स्ट लर्नर आहेत. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करुन त्यांना रोजगारक्षम बनविण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे. याशिवाय विद्यापीठाला जास्तीतजास्त समाजाभिमुख कसं होता येईल, त्यासाठी आमचे निरंतर प्रयत्न सुरु आहेत. 'कॅम्पस टू कम्युनिटी' हा विषय आम्ही हाती घेतला असून विद्यापीठ व्यवस्थेवर समाजाचा विश्वास कसा वाढेल आणि जास्तीतजास्त विद्यार्थ्यांना रोजगार कसा मिळेल, यासाठी आमचे प्रयत्न आहेत.

नोकऱ्या कमी आहेत, असे असले तरी आमच्या विद्यार्थ्यांचे टॅलेन्ट ओळखून उद्योजकांनी त्यांना नोकऱ्या देण्याची गरज आहे. विद्यापीठाचे अभ्यासक्रम, परीक्षापद्धत बदलण्याची गरज असून त्यासाठी आमचा प्रयत्न सुरु आहे. औपचारिक शिक्षकपद्धतीसह वेगळे शिक्षण त्याला आम्ही देवू, असे सांगून त्यांनी विद्यापीठात बांबू प्रशिक्षण केंद्र, इनक्युबेशन सेंटर, ट्रायबल रिसर्च सेंटर सुरु होणार असल्याची माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या हितासाठी एन.जी.ओ. शी करार करुन काही प्रोजेक्टस हाती घेतले आहेत. या सभेच्या निमित्ताने विद्यार्थ्यांचा पुढील प्रवास यशस्वी होण्यासाठी सर्वांचे सहकार्य व साथ मिळेल, अशी अपेक्षा कुलगुरुंनी व्यक्त केली.

प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर यांनी मिशन २०-२२ विद्यापीठाने तयार केले असून समाजाने विद्यापीठासाठी व विद्यापीठाने समाजासाठी कार्य करावे, असे सांगून आयोजित सभा ऐतिहासिक असल्याचे ते म्हणाले. एम.बी.ए. विभागप्रमुख डॉ. संतोष सदार यांनी पी.पी.टी. द्वारा सादरीकरण करतांना सांगितले, उच्चशिक्षणात तंत्रज्ञानाच्या वापरावर अधिक भर दिल्या जात आहे. विद्यापीठ व उद्योग यांच्यामध्ये समन्वय महत्वाचा असून रोजगाराभिमुख अभ्यासक्रमाची गरज तद्वतच नीडबेस संशोधन होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना जे शिक्षण हवे आहे, ते देण्याची खरी गरज असून त्यासाठी सर्वांचे प्रयत्न फलश्रुत ठरु शकतात. स्टार्टअप, सस्टेनेबल डेव्हलपमेन्ट आदी महत्वपूर्ण उपक्रम विद्यापीठ राबवित असून कुमारीमातेचे प्रश्न हाती घेवून ते सोडविण्याचा प्रयत्न करणारे अमरावती विद्यापीठ भारतातील बहुधा एकमेव असावे. खेड्यांचा विकास होण्याची गरज असून त्याकरीता विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयांनी खेडे दत्तक घेण्याची गरज असण्यावर त्यांनी भर दिला.

विद्यापीठ गीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली. संचालन कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी तर आभार रा.से.यो. चे प्रभारी संचालक डॉ. राजेश मिरगे यांनी मानले. यावेळी एम.आय.डी.सी. असोसिएशनचे अध्यक्ष श्री किरण पातुरकर, जाधव इंडस्ट्रीजचे संचालक श्री संजय जाधव, प्रयासचे डॉ. अविनाश सावजी, फॉरेन्सिकचे डॉ. विजय ठाकरे, मालवीय, निंभोरकर यांनी याप्रसंगी महत्वपूर्ण सूचना मांडल्यात. यावेळी विद्यापीठाने वर्षभर आयोजित केलेल्या कार्यक्रमावर आधारित चित्रफित दाखविण्यात आली. सभेला माजी विद्यार्थी, उद्योजक, हिततुल्य घटक, एन.जी.ओ., संशोधक, तसेच विद्यापीठाचे प्रशासकीय व शैक्षणिक विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

प्रति,

**जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दि. ०३/०५/२०१८.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी